<u>निशाणी क्र. ११</u>

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी शपथेवर सुरू...</u>**

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख-याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव : अंकुश वामन चव्हाण,**
**वय** **:** ३५ वर्षे,
**व्यवसाय** **:** मजुरी,
**पत्ता** **:** रा. घारगाव तांडा, ता. कळंब, जि. धाराशिव

**<u>साक्षीदार क्र. ०१ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. टी. वैदय यांचे मार्फत</u>**

१. दिनांक १३/०६/२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क पोलिसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. मी घारगाव येथील आदित्य चौक येथे थांबलो असताना पंचनाम्यावर सही घेतली. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. पंचनाम्यातील मजकूर मला माहिती नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. सहीस ओळखीपुरता **<u>निशाणी क्र.१२</u>** देण्यात येतो.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, मला राज्य उत्पादन शुल्क पोलिसांनी दिनांक १३/०६/२०२५ रोजी घारगाव तांडा येथील आरोपीच्या राहते घरासमोरील पत्राशेडमध्ये पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व दुसरा पंच नामे वैजिनाथ सखाराम जाधव यांचेसह पोलीसांनी छापा मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एक इसम बेकायदेशीररीत्या विनापास परवाना दारू विक्री करत असताना मिळून आला. त्याला त्याचे नाव विचारले असता तिने तिचे नाव भुराबाई बालू पवार असे सांगितले. आरोपीचे ताब्यात तीन २०० लीटर क्षमतेच्या प्लास्टीकच्या बॅरलमध्ये अंदाजे ६०० लीटर भरलेले रसायन बॅरलसह अंदाजे २३,०००/- किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही

की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष १८० मि.ली.क्षमतेच्या पंचांच्या सहया असलेले लेबल असलेली एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढली. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ही माझया ओळखीची असल्यामुळे तिला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. ए. सी. चोंदे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

सही/-

**दिनांक: १६.०७.२०२६** **(अमृता डी. जाधव)**
**ठिकाण: कळंब** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**
**(कोर्ट क्र.३)कळंब.**